नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २४६ Issue - 246 | वार रविवार दि. २५ जानेवारी २०२६ Blow- Sunday Date 25 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# महायुतीचा झेडपीलाही बिनविरोध पॅटर्न जोरात

## जिल्हापरिषद निवडणुकीत महायुतीचे ११ उमेदवार बिनविरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महापालिका निवडणुकानंतर आता जिल्हा परिषद (नझ) आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही भाजप महायुतीचा बिनविरोध पॅटर्न पाहायला मिळत आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज सिंधुदुर्ग जिल्हा परिषद निवडणुकीत भाजप महायुतीचे तब्बल ११ उमेदवार बिनविरोध झाले आहेत. त्यामध्ये, भाजपचे (इगझ) १० आणि शिंदेंच्या शिवसेनेचा १ उमेदवार बिनविरोध आहे. जिल्हा परिषद गटातून ५ उमेदवार बिनविरोध असून ६ उमेदवार पंचायत समिती गणातून बिनविरोध आहेत. त्यामुळे, महायुतीने महापालिकेप्रमाणेच जिल्हा परिषदेतही बिनविरोध पॅटर्न कायम ठेवल्याचं दिसून येत आहे. विशेष म्हणजे सिंधुदुर्ग हा भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचाच मूळ जिल्हा आहे.

जिल्हा परिषद निवडणुकासाठी उमेदवारी अर्ज प्रक्रिया संपुष्टात येत असून अर्ज छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. त्यामुळे, अपक्ष उमेदवारांकडून अर्ज मागे घेतले जात असून काही विरोधी पक्षातील उमेदवारही नांग्या टाकत आहेत. त्यामध्ये, सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेत ५ आणि पंचायत समितीत एकूण ६ उमेदवार बिनविरोध झाले आहेत. त्यामध्ये, जिल्हा परिषद गटात भाजपचे ४ आणि शिंदेंच्या शिवसेनेचा एक उमेदवार बिनविरोध आहे. तर, पंचायत समितीमध्ये ६ ही उमेदवार भाजपचे आहेत.

**जिल्हा परिषदेत ५ अन् पं. समितीला ६ उमेदवार विजयी**

राजकीय व्यूहरचना आणि विरोधकांची माघार

खासदार नारायण राणे यांच्या आणि मंत्री नितेश राणे यांच्या प्रत्यक्ष व्यूहरचनेमुळे जिल्ह्यातील अनेक जागांवर विरोधकांनी आपली उमेदवारी मागे घेतली. विशेषतः कणकवली मतदारसंघात राणे यांचा मोठा प्रभाव पाहायला मिळत आहे. अर्ज मागे घेण्याची शेवटची मुदत २७ जानेवारी असल्याने, शेवटच्या टप्प्यात पालकमंत्री विरोधकांना आणखीन काही धक्के देण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. हा विजय म्हणजे जनतेचा राणे कुटुंबीयांवरील विश्वास आणि महायुतीच्या कामाची पावती आहे. उरलेल्या ४५ जागांवरही आमचा करिष्मा कायम राहील, अशी भावना कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.

जिल्हा परिषद सिंधुदुर्ग महायुती (बिनविरोध)

१. खारेपाटण जि.प.उमेदवार- प्राची इस्वलकर(भाजप)

२. जानवली जिल्हा परिषद रुहिता राजेश तांबे (शिवसेना शिंदे गट)

३. पडेल जिल्हा प.(देवगड) सुयोगी रवींद्र घाडी (भाजप)

४. बापर्डे जिल्हा प.(देवगड) अवनी अमोल तेली (भाजप)

५. बांदा जिल्हा प. उमेदवार प्रमोद कामत (भाजप)

कणकवली तालुका पंचायत समिती महायुती( बिनविरोध)

१. बिडवाडी - संजना संतोष राणे (भाजप )

२. वरवडे - राजेश (सोनू) सावंत (भाजपा)

देवगड तालुका पंचायत समिती(बिनविरोध)

१. पडेल - अंकुश यशवंत ठूकरूल (भाजप)

२. नाडण - गणेश सदाशिव राणे (भाजप)

३. बापर्डे - संजना संजय लाड (भाजप)

वैभववाडी तालुका पंचायत समिती (बिनविरोध)

१. कोकिसरे - सौ.साधना सुधीर नकाशे (भाजप)

# दावोस दौरा शंभर टक्के यशस्वी; ३७ लाख कोटींचे सामंजस्य करार

## सुमारे ४३ लाख रोजगारनिर्मिती : उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : दावोस (स्वित्झर्लंड) येथे झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये आतापर्यंत एकूण ३७ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले असून, त्यातून राज्यात सुमारे ४३ लाख युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे दावोस दौरा शंभर टक्के यशस्वी ठरलेला आहे, अशी माहिती उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी मुंबई येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

उद्योगमंत्री सामंत म्हणाले की, दावोसमध्ये एकूण ८१ करार झाले असून, त्यापैकी १६.६९ लाख कोटी रुपयांचे ५१ करार उद्योग क्षेत्रातील आहेत. 'एमएमआरडीए' अंतर्गत २४ करार असून त्यांची किंमत १९.४३ लाख कोटी रुपये आहे, तर सिडको अंतर्गत ६ करार १.१५ लाख कोटी रुपयांचे आहेत. एकूण गुंतवणुकीपैकी सरासरी ८० टक्के थेट परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात येणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

मागील वर्षी दावोस येथे झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये १५ लाख कोटींच्या सामंजस्य कराराची मोठ्या प्रमाणात अंमलबजावणी सुरू आहे. गडचिरोली, छत्रपती संभाजीनगर, रत्नागिरी, रायगड आदी जिल्ह्यांत प्रत्यक्ष उद्योग उभे राहत असल्याचे उद्योग मंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले.


दावोस दौऱ्यात ऑटोमोबाईल, रिअल इस्टेट, डिफेन्स, फार्मा अशा सर्व क्षेत्रांतील गुंतवणूक महाराष्ट्रात येणार असून, तिसऱ्या मुंबईतील रायगड-पेण ग्रोथ सेंटरसाठी एक लाख कोटींच्या गुंतवणुकीचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय 'एमएमआर' क्षेत्रात सुमारे २३ लाख कोटी, मल्टीपल लोकेशन्समध्ये ७.७२ लाख कोटी, कोकणात ३.१० लाख कोटी, नागपूरमध्ये १.९५ लाख कोटी, नाशिकमध्ये ३०,१०० कोटी, छत्रपती संभाजीनगरमध्ये १७,७०० कोटी, पुण्यात ३,२५० कोटी आणि अमरावतीत १,००० कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असल्याचे त्यांनी सांगितले.

परकीय गुंतवणुकीच्या बाबतीत महाराष्ट्र देशात अव्वल असल्याचे सांगताना उद्योगमंत्री डॉ.सामंत म्हणाले की, केंद्र शासनाच्या सर्वेक्षणानुसार मागील वर्षी महाराष्ट्रात १.६४ लाख कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणुकीची नोंद झाली आहे. त्याचबरोबर, उद्योग उभारणीसाठी किमान चार ते पाच वर्षांचा कालावधी लागतो, हे लक्षात घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दावोस दौऱ्यावरील खर्चाबाबतही लवकरच सविस्तर माहिती जनतेसमोर मांडणार असल्याचे सांगून, बल्क ड्रग पार्क प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेला नसून तो रायगडमध्येच उभारला जात असल्याचे उद्योगमंत्री डॉ.सामंत यांनी स्पष्ट केले. उद्योग विभागावर होणारी तथ्यहीन टीका थेट उद्योजकांपर्यंत पोहोचते, त्यामुळे राज्यात नकारात्मक वातावरण निर्माण होऊ नये यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन उद्योगमंत्री डॉ. सामंत यांनी यावेळी केली.

# ईडीच्या केसमध्ये भुजबळांना क्लीन चीट, दमानियांचा फडणवीसांवर संताप; हायकोर्टात जाणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांची महाराष्ट्र सदन घोटाळ्यात एसीबीनंतर आता ईडीच्या केसमध्येही निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. त्यावरुन, आता राजकीय प्रतिक्रिया येत असून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही आपली भूमिका मांडली आहे. छगन भुजबळांवरील एक प्रकरण अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे, त्यांना कुठलीही क्लीन चीट मिळाली नसून आपण उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचंही अंजली दमानिया यांनी म्हटलं. तसेच, छगन भुजबळ यांना मागच्या आणि आत्ताच्या दोन्ही सरकारने वाचवलं आहे. फडणवीस भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन पुढे जात आहेत, असा गंभीर आरोपही दमानिया यांनी केला.

सक्तवसुली संचालनालय (एऊ) भुजबळ यांच्याविरुद्ध मनी लॉन्ड्रिंगच्या प्रकरणाचा तपास करत होते. सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना त्यांनी कोणतीही निविदा न मागवता 'के.एस. चामणकर एंटरप्राइजेस'ला कंत्राट दिले असा आरोप करण्यात आला होता. छगन भुजबळ आणि इतरांनी निर्दोष (पान २ वर...)

# टी २० वर्ल्ड कपमधून बांगलादेशला बाहेरचा रस्ता दाखवला, स्कॉटलंडची एंट्री होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली :आयसीसीनं टी २० वर्ल्ड कप २०२६ साठी बांगलादेशच्या जागी स्कॉटलंडला स्थान दिलं आहे. टी २० वर्ल्ड कप २०२६ मध्ये बांगलादेश क गटात होता. आता स्कॉटलंड बांगलादेशच्या जागी गट क मधून खेळेल. बांगलादेश क्रिकेट बोर्डानं सुरक्षेचं कारण देत त्यांचे सामने श्रीलंकेत स्थलांतरित करावेत अशी मागणी केली होती. ती आयसीसीकडून फेटाळण्यात आली होती. यानंतर बांगलादेश सरकारच्या निर्णयाचा दाखला देत बीसीबीनं भारतात टी २० वर्ल्ड कप २०२६ चे सामने खेळण्यास नकार दिला होता. आयसीसीनं आता बांगलादेशच्या जागी स्कॉटलंडला संधी दिली आहे. याबाबत क्रिकबझनं ट्विट केलं आहे.

क्रिकबझच्या रिपोर्टनुसार आयसीसीनं अधिकृतपणे टी २० वर्ल्ड कप २०२६ मध्ये स्कॉटलंडला स्थान दिलं आहे. ते आता बांगलादेशच्या जागी क गटात खेळतील. स्कॉटलंडचे तीन सामने कोलकाता येथील ईडन गार्डन्समध्ये होतील. तर, एका सामना मुंबईत होणार आहे. स्कॉटलंडला वेस्ट इंडिज, इटली आणि इंग्लंड विरुद्ध कोलकाता येथे खेळावं लागेल. तर, १७ फेब्रुवारीला मुंबईत त्यांचा सामना नेपाळ सोबत होईल.

आयसीसीनं बांगलादेश क्रिकेट बोर्डाला त्यांचा निर्णय कळवण्यासाठी २४ तासांचा वेळ दिला होता. बांगलादेश क्रिकेट बोर्डानं बांगलादेश सरकारनं भारतात सामने न खेळण्याचा निर्णय घेतल्याचं जाहीर केलं. यानंतर आयसीसीनं स्कॉटलंडला संधी दिली आहे. बांगलादेश सरकार आणि बांगलादेश क्रिकेट बोर्डाचा निर्णय चुकीचा असल्याचं काही दिग्गजांनी म्हटलं आहे. भारतात टी २० वर्ल्ड कप न खेळल्यानं बांगलादेशला ३०० कोटी रुपयांचं नुकसान होणार आहे.


बांगलादेशात २ हिंदू तरुणांची हत्या झाल्यानंतर भारतात केकेआरचा विरोध सुरु झाला होता. केकेआरनं मुस्तफिजूर रहमानला ९.२० कोटी रुपयांना टीममध्ये घेतलं होतं. यानंतर केकेआरनं बीसीसीआयच्या आदेशानं बांगलादेशचा खेळाडू मुस्तफिजूर रहमानला संघातून वगळण्याचा निर्णय घेतला. यानंतर बांगलादेश क्रिकेट बोर्डानं तातडीनं बैठक बोलावली आणि त्यांनी टी २० वर्ल्ड कपचे सामने श्रीलंकेत खेळवावेत अशी भूमिका घेतली. मात्र, बीसीसीआयनं त्याला नकार दिला. लॉजिस्टिक, हॉटेल बुकिंग आणि इतर गोष्टींमध्ये बदल अशक्य असल्यानं बीसीसीआय त्यांच्या भूमिकेवर ठाम राहिली.

**रशियन तेल खरेदीमुळं लादले होते टॅरिफ**

**अमेरिकेकडून मोठे संकेत**

# भारतावरील २५ टक्के टॅरिफ रद्द होण्याची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के टॅरिफ लादलेलं आहे. याशिवाय भारत रशियाकडून कच्चे तेल खरेदी करत असल्यानं ट्रम्प यांनी अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ भारतावर लादलेलं आहे. म्हणजेच अमेरिकेनं भारतावर एकूण ५० टॅरिफ लादलं आहे. भारतानं रशियाकडून तेल खरेदी कमी केल्यानं अमेरिकेकडून सकारात्मक संकेत देण्यात आले आहेत. भारतावर लादलेलं अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ रद्द होऊ शकतात असे संकेत अमेरिकेकडून देण्यात आले आहेत.

अमेरिकेचे ट्रेजरी सेक्रेटरी स्कॉट बेसेंट यांनी भारतावर रशियन तेल खरेदीमुळं लादलेलं २५ टक्के टॅरिफ हटवण्यासंदर्भात एक मार्ग काढला जाऊ शकतो, असं म्हटलं आहे. पॉलिटिकोला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी म्हटलं की भारतानं रशियन क्रूड ऑईलची खरेदी कमी केली आहे. यामुळं टॅरिफ आता हटवलं जाऊ शकतं.

स्कॉट बेसेंट यांनी डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाच्या धोरणाचं हे यश असल्याचं म्हटलं. आम्ही भारतावर रशियन तेल खरेदी केल्यामुळं २५ टक्के टॅरिफ लादलं होतं. आता भारतीय रिफायनरींकडून रशियन तेल खरेदी जवळपास बंद करण्यात आली आहे. हे मोठं यश आहे. ते म्हणाले की २५ टक्के टॅरिफ अजूनही लागू आहे. आता ते हटवण्यासंदर्भात विचार केला जाऊ शकतो.

रशिया आणि यूक्रेन यांच्यातील युद्ध सुरु होण्यापूर्वी भारतातील तेल रिफायनरी कंपन्या रशियन क्रूड ऑईल २-३ टक्के खरेदी करत होत्या. मात्र, युद्धामुळं पाश्चिमात्य देशांनी रशियावर निर्बंध घातले असता रशियानं सवलतीच्या दरात तेल विक्री सुरु केली. भारतानं रशियाकडून तेल खरेदी वाढवली. भारताची रशियन तेलाची खरेदी १५-१९ टक्क्यांपर्यंत पोहोचली होती. यामुळं भारतीय रिफायनरींना मोठा नफा देखील झाला.

अमेरिकेनं भारतावर अतिरिक्त २५ टक्के टॅरिफ लादत रशियन तेल खरेदीपासून दूर करण्याचा प्रयत्न केला. स्कॉट बेसेंट यांच्या मते भारतीय रिफायनरीज रशियाकडून तेल खरेदी कमी करत असून त्या पश्चिम आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेकडून तेल खरेदी करत आहेत.

स्कॉट बेसेंट यांनी यूरोपियन देशांवर यावेळी टीका केली. यूरोपमधील देश रशियाविरोधात बोलतात. मात्र, भारतीय रिफायनरजीकडून बनवण्यात आलेल्या रिफाइंड उत्पादनांची खरेदी करतात, जे रशियन क्रूडपासून बनवलेलं असतं. यामुळं यूरोपमधील देश अप्रत्यक्षपणे रशियाला अर्थसहाय्य करत आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून रशिया आणि यूक्रेन युद्ध संपवण्यासाठी प्रयत्न देखील करण्यात आले होते. मात्र, त्याला यश आलं नव्हतं.

दरम्यान भारताची तेल खरेदीबाबतची भूमिका जागतिक मार्केटमधील स्थितीवर आणि देशातील ग्राहकांचं हित लक्षात घेत निश्चित होत असते.

# प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्यातून मिळतोय जलद न्याय..!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : 'सर्वांसाठी न्याय.. जलद न्याय' या तत्वावर राज्य शासन काम करीत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली जलद गतीने न्याय मिळण्यासाठी न्यायदान साखळीतील कमतरता दूर करण्यात येत आहे. नवीन फौजदारी कायद्याअंतर्गत जलद न्यायाला प्राधान्य दिले असून त्यानुसार न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात येत आहे. त्यामुळे न्यायदानाची प्रक्रिया जलद झाली आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुढाकार**

न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय अंतर्गत असलेली प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष मोहीम राबविण्याबाबत सूचित केले. तसेच त्यांनी नियमित आढावा घेत या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची प्रक्रिया गतिमान केली. संचालनालयाकडील प्रयोगशाळांमध्ये २०२५ मध्ये एक लाख ८१ हजार प्रकरणे प्रलंबित होती. तसेच दोन लाख ९४ हजार इतकी प्रकरणे आवक झाली. संचालनालयाने विशेष मोहिम राबवून डिसेंबर २०२५ अखेर तीन लाख ९६ हजार ८७९ इतक्या प्रकरणांचा निपटारा करून ७९ हजार ५४२ इतकी प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी केली आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत सर्व विभागांच्या प्रचलित मानकांमध्ये वाढ करून संचालनालयातील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांचेकडून सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत कामाचे जादा तास वाढवून, शासकीय सुट्टीच्या दिवशी काम करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली. संचालनालयातील कार्यरत मनुष्यबळाकडून कमीत कमी दोन लाख ते दोन लाख १५ हजार प्रकरणांचा निपटारा करण्याची क्षमता (पान २ वर..)

# ‘पुणे ग्रँड टूर’मुळे पुण्याचे नाव जागतिक पातळीवर

## उपमुख्यमंत्री अजित पवार; ‘पुणे ग्रँड टूर’च्या अंतिम टप्प्याचा बालेवाडी येथे शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : ‘पुणे ग्रँड टूर’ या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या आयोजनासाठी प्रशासनाने उत्कृष्ट नियोजन करत दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण केल्या असून, याबाबत केंद्र सरकारसह देश-विदेशातील सायकलपटूंनी समाधान व्यक्त केले आहे. या स्पर्धेमुळे पुणे जिल्ह्याचे नाव जागतिक पातळीवर पोहोचल्याचे प्रशंसोद्गार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

उपमुख्यमंत्री पवार आणि केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते ‘पुणे ग्रँड टूर’च्या अंतिम टप्प्याला श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला.

यावेळी खासदार मेधा कुलकर्णी, क्रीडा व युवक सेवा आयुक्त शीतल तेली उगले, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे, पिंपरी-चिंचवड शहर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, आंतरराष्ट्रीय सायकलिंग संघटनेच्या (युसीआय) महासंचालक अमिना लानाया, आशियाई सायकलिंग महासंघाचे अध्यक्ष दातो अमरजीत सिंग गिल, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे महासचिव दातो मनिंदर पाल सिंग, अभिनेता अमीर खान, बजाज ऑटोचे कर विभागाचे उपाध्यक्ष चेतन जोशी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, बजाज पुणे ग्रँड टूर या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचे आयोजन केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त प्रयत्नातून पुणे, पिंपरी-चिंचवड शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात १९ ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात आले. या स्पर्धेला शहर व ग्रामीण भागातील क्रीडारसिकांनी मोठ्या उत्साहात प्रतिसाद दिला असून, युवक, युवती, महिला, शेतकरी, विद्यार्थी आदी सर्व घटकांचा त्यात सहभाग दिसून आला. यापूर्वी पुण्यात झालेल्या स्पर्धेलाही पुणेकरांनी भरभरून प्रतिसाद दिला होता.

आगामी ऑलिम्पिक स्पर्धांचे यजमानपद भारताला मिळावे, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्नशील असून, क्रीडा क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि प्रतिभावंत खेळाडू घडावेत या उद्देशाने श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे उभारण्यात आले आहे. राज्यासह देशात अधिकाधिक आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचा प्रयत्न राज्य शासन करत राहील, असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे म्हणाल्या, ‘पुणे ग्रँड टूर’चे महाराष्ट्र सरकार व जिल्हा प्रशासनाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल अत्यंत आनंद होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ‘विकसित भारत-२०४७’ या संकल्पनेच्या पूर्ततेत क्रीडा क्षेत्राचा मोठा वाटा असणार असून, देश क्रीडा क्षेत्रात सातत्याने प्रगती करताना दिसत आहे. क्रीडा क्षेत्राला ‘सॉफ्ट पॉवर’च्या माध्यमातून पुढे नेण्याचा प्रयत्न सुरू आहे. शासन व प्रायोजकांच्या सहकार्याने स्पर्धेसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या असून, त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. जागतिक पातळीवरील खेळाडूंना एकत्र आणून क्रीडा पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न या स्पर्धेच्या माध्यमातून करण्यात आला असून, भारत क्रीडा पर्यटनाचे केंद्र म्हणून पुढे येत आहे, ही अभिमानाची बाब आहे.

यावेळी अभिनेता अमीर खान यांनीही ‘पुणे ग्रँड टूर’च्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले.

दरम्यान, जर्मनीचे सायकलपटू बेंडकी बेकर यांना यावेळी मानवंदना (गार्ड ऑफ ऑनर) देण्यात आली. बेकर यांनी सलग २० वर्षे सायकलपटू म्हणून विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग घेतला असून, या स्पर्धेनंतर ते सायकलिंगमधून निवृत्त होत आहेत.



## प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्यातून मिळतोय जलद न्याय..!

(पान १ वरून..)

असतानाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार तीन लाख ९६ हजार ८७९ इतक्या प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. प्रलंबित प्रकरणांपैकी एक लाख ०२ हजार ४१३ इतक्या जास्त प्रकरणांचा निपटारा करण्यात संचालनालयाला यश आले आहे.

डिसेंबर २०२५ अखेर प्रलंबित प्रकरणांपैकी ‘कन्व्हेक्शनल फॉरेन्सीक’ या विभागाने तीन लाख ९६ हजार २७५ इतक्या प्रकरणांचा निपटारा केला आहे. तसेच या विभागात २७ हजार ५२४ आवक प्रकरणांची संख्या असून फेब्रुवारी २०२६ पासून ज्या दिवशी प्रकरण आवक होईल, त्याच दिवशी प्रकरणांचे विश्लेषणाचे काम सुरू होईल, त्यामुळे दिवसेंदिवस प्रकरण प्रलंबित असण्याची बाब इतिहासजमा होऊन पिडितांना जलदगतीने न्याय मिळण्याची व्यवस्था निर्माण होत आहे. संगणक गुन्हे विभाग, सायबर, ध्वनी व ध्वनीफित विभागातील प्रलंबित प्रकरणांचा निपटाराही जलदगतीने करण्यात येत आहे.

न्यायदान प्रक्रिया जलद झाल्यामुळे पीडितांना वर्षानुवर्षे न्यायासाठी प्रतीक्षा करावी लागणार नाही. गतिमान न्यायदान करण्यासाठी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाची महत्त्वाची भूमिका आहे.

त्यामुळेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संचालनालयाला अधिक सक्षम करण्यावर भर दिला आहे. राज्यातील प्रत्येक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाला ‘मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन’ उपलब्ध करून देण्यात येत आहे. या सर्वांचा परिपाक म्हणून न्यायदानाची प्रक्रिया गतिमान होण्यास मदत होत आहे.

# घोटी येथील जनता विद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी/सोमनाथ गिरी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलित घोटी येथील जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेज मध्ये ’ मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ विविध कार्यक्रमानी उत्साहात साजरा करण्यात आला. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे तालुका संचालक ड. संदीप भाऊ गुळवे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने विद्यालयात भव्य ग्रंथ प्रदर्शन व भव्य ग्रंथदिंडी पारंपारिक आणि उत्साही वातावरणात गावातून आयोजित करण्यात आली . व्यासपीठावर शालेय समितीचे अध्यक्ष मनोजभाऊ जाधव, उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष राजेंद्र आप्पा जाधव ,शालेय समितीचे सदस्य नरेंद्र मेधने, दिपा कंदकुरीवार, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष गोरक्षनाथ गव्हाणे ,दत्तात्रय भोर ,विद्यालयाचे प्राचार्य नितीन भामरे,उपमुख्याध्यापक उल्हास पवार ,पर्यवेक्षक हिरामण चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. आकर्षक सजवलेल्या पालखीत भगवदगीता व इतर ग्रंथ ठेवण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन आणि ग्रंथपूजनाने झाली. उपस्थित मान्यवरांनी ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करून ग्रंथांचा आस्वाद घेतला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सजून साहित्यिकांचे ग्रंथ, घोषवाक्यांचे फलक हातात घेत परिसरात वाचनाची सवय लावणे ही नव्या पिढीची महत्त्वपूर्ण जबाबदारी असून पुस्तक आणि भाषा हेच खरे ज्ञानाचे दीपस्तंभ असल्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. ग्रंथदिंडीचे उद्घाटन उच्च माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष राजेंद्र आप्पा जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

### भव्य ग्रंथप्रदर्शन व ग्रंथदिंडी आयोजन

मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी विविध उपक्रम राबविण्यात आल्याची माहिती प्राचार्य नितीन भामरे यांनी आपल्या प्रास्ताविकातून दिली. प्राचार्य नितीन भामरे म्हणाले की, मराठी भाषा ही फक्त संवादाचे साधन नसून ती आपल्या संस्कृतीची,परंपरेची आणि ओळखीची मानबिंदू आहे. मराठी भाषेबद्दल अभिमान जागवणे आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढवणे हा या पंधरवड्याचा मुख्य हेतू असल्याचे प्राचार्य भामरे यांनी स्पष्ट केले.

पंधरवडानिमित्ताने वाचनप्रेरणा उपक्रम,कविता वाचन,निबंधलेखन, शब्दसंपदा वाढवा अभियान, वाचनदिंडी, कथाकथन,सामान्यज्ञान स्पर्धा , वकृत्व स्पर्धा अशा अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.उपमुख्याध्यापक उल्हास पवार यांनी मराठी ही आपली मायबोली, संस्कृतीची शान आणि अभिमान असल्याचे सांगितले.पर्यवेक्षक हिरामण चौधरी यांनी शुद्ध मराठीत बोलणे, लिहिणे ही आपली जबाबदारी आहे विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा इतिहास,वैशिष्ट्ये आणि आजच्या काळातील महत्व याबाबत मनोगत व्यक्त केले. कवी मुकुंद ताकाटे, कवी प्रशांत केंदळे,व्याख्याते सोमनाथ मत्ससागर यांनी विविध कविता सादर करून विद्यार्थ्यांचे मनोरंजन करून वाचनाचे महत्त्व स्पष्ट केले .आई विषयी व इतर कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली.यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठीबद्दल प्रेम, आदर आणि संवर्धनाची भावना वृद्धिंगत होण्यासाठी मदत होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सूर्यवंशी यांनी केले तर आभार सोमनाथ गिरी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक , शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थी यांनी मोलाचे योगदान दिले.

## ईडीच्या केसमध्ये भुजबळांना क्लीन चीट, दमानियांचा फडणवीसांवर संताप; हायकोर्टात जाणार

(पान १ वरून..) मुक्ततेसाठी केलेला अर्ज कोर्टाने मंजूर केला आहे. मात्र, अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषद घेऊन संबंधित प्रकरणावर आणि निर्णयावर भाष्य केलं आहे.

छगन भुजबळांविरुद्ध २०१४ ला जनहित याचिका दाखल केल्यापासून माझा लढा सुरू आहे. एकूण ११ घोटाळे आणि त्यातून मिळणारे पैसे यासंदर्भात आम्ही जनहित याचिका दाखल केली होती. तीन गुन्हे दाखल झाले, आतापर्यंत दोन गुन्ह्यांमध्ये दिलासा मिळाला आहे, एक गुन्हा बाकी आहे. कोर्टाला योग्य ती माहिती न दिल्यामुळे गुन्हे रद्द केले असतील, मी मुख्य न्यायमूर्तींकडे यासंदर्भात पत्र लिहणार आहे. कलिना सेंट्रल लायब्ररीचं प्रकरण अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे, अद्याप छगन भुजबळांना क्लीन चीट नाही, असे म्हणत आपण उच्च न्यायालयात धाव घेणार असल्याचे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी म्हटलं.

आता देशाच्या सरन्यायाधीश न्यायवृंद तसेच मुख्यमंत्र्यांना देखील मी पत्र लिहिणार आहे. मी या निर्णयावर स्थगिती देण्याची मागणी मुंबई उच्च न्यायालयात करणार आहे. एसीबीने अपील करणं अपेक्षित होतं, मात्र सगळे एका माळेचे मणी आहेत. उद्धव ठाकरे सरकारने ३१ मार्च २०२२ ला शासन निर्णय रद्द करण्यासाठी दुसरा शासन निर्णय काढला. एप्रिल २०२३ मध्ये पुन्हा एक शासन निर्णय काढून अपिलमध्ये जाण्याचा शासन निर्णय काढला. मात्र, महाराष्ट्र सदन घोटाळ्याचं प्रकरण अद्याप संपल नाही. सगळ्या सरकारांनी त्यांना वाचवलं, आधी ठाकरेंनी वाचवलं मग फडणवीसांनी वाचवलं, असे म्हणत अंजली दमानियांनी दोन्ही सरकार भुजबळांच्या पाठीशी असल्याचं त्यांनी म्हटलं.

फडणवीस सगळ्या भ्रष्टाचारांना घेऊन पुढे जात आहेत - दमानिया

पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन, सगळे घोटाळे हे देवेंद्र फडणवीस यांनी संपुष्टात आणले आहेत. त्यासाठी त्यांना महाराष्ट्र कधी माफ करणार नाही. ईडीच्या आरोपपत्राचे सगळे पुरावे आहेत, प्रत्येकाचा जबाब दिला आहे, तरी असा निर्णय आला हे दुर्दैवी आहे. भाजपची ही मोडस ऑपरेंडी आहे, आधी आरोप करा त्यांच्या मागे तपास यंत्रणा लावा आणि त्यांना पक्षात घ्या. फडणवीस यांनी भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्राचा नारा दिला होता आणि आज हेच फडणवीस सगळ्या भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन पुढे जात आहेत. आता कित्येक पटींनी लूट सुरू आहे. त्यामुळे, फडणवीस यांनी महाराष्ट्राला याचं उत्तर द्यावं. सध्या राज्यात केवळ बोली लावण्याचं राजकारण सुरू आहे, असे म्हणत दमानिया यांनी फडणवीसांनाही सवाल केले आहेत.

दरम्यान, याप्रकरणी, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (उइ) असा दावा केला होता की, सरकारी कर्मचाऱ्यांनी अहवालात चुकीची माहिती दिली आणि बनावट ताळेबंद तयार केला. विकासकाला १.३३ टक्के नफा होणार असल्याचे दाखवण्यात आले, मात्र प्रत्यक्षात तो ३६५.३६ टक्के होता, असा एसीबीचा आरोप होता.

# काटेकोर नियोजनातून सोनेवाडी बुद्रुक येथील निचीत परिवाराची द्राक्षशेतीत यशस्वी वाटचाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




**मविप्र समाजाचे कर्मयोगी दुलाजी सितराम पाटील कृषी महाविद्यालय, चाचडगाव येथील विद्यार्थिनींनी सोनेवाडी बुद्रुक येथील सागर निचीत यांच्या यशोगाथेचा अभ्यास केला.प्राचार्य डॉ.बी.डी.भाकरे, प्रा. एस. बी. सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली गायत्री आहेर,मुक्ता चांदगुडे,वसुधा बैरागी,हर्षदा बोरसे,हिरन चौधरी,गायत्री बानकर यांनी त्यांच्या द्राक्षबागेची पाहणी करून उत्पादन व्यवस्थापन, अडचणी आणि यशाचे घटक यांचा सखोल अभ्यास केला. तालुक्यातीलच नव्हे तर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी सागर निचीत यांची कहाणी प्रेरणादायी ठरत आहे. योग्य नियोजन, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब आणि निरंतर परिश्रम यांच्या जोरावर शेतीतूनही समृद्धी साध्य करता येते, हा ठोस संदेश त्यांच्या कार्यातून संपूर्ण जिल्ह्यात पसरत आहे**

निफाड/प्रतिनिधी : परंपरागत शेतीला आधुनिकतेची जोड देत द्राक्षशेतीत उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या निफाड तालुक्यातील सोनेवाडी बुद्रुक गावातील सागर निचीत या प्रगतिशील शेतकऱ्याची ही प्रेरणादायी कहाणी आहे. बी.एससी. शिक्षण पूर्ण केलेल्या या तरुण शेतकऱ्याने वडिलांच्या मार्गदर्शनाखाली शेतीची सूत्रे हाती घेतली आणि आज द्राक्षशेतीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

या शेतकऱ्याकडे एकूण १२ एकर जमीन असून त्यापैकी ६ एकर क्षेत्रावर द्राक्षांची लागवड करण्यात आली आहे. थॉम्पसन सीडलेस, अनुष्का,१५३० व्होलकणी , अशा उच्च दर्जाच्या जातींची लागवड करून त्यांनी गुणवत्तापूर्ण उत्पादनावर भर दिला आहे.वडिलांनी १९९९ साली सुरू केलेली द्राक्षशेती त्यांनी पुढे आधुनिक पद्धतीने विकसित केली असून गेल्या ९-१० वर्षांपासून ते स्वतः सक्रियपणे शेती करत आहेत. पीपीएफ फार्मच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळे आणि त्यांच्या यशस्वी शेतीकडे पाहून त्यांना द्राक्ष शेती करण्याची प्रेरणा मिळाली.त्यांच्या शेतीतील यश पाहून आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यामुळे सुरुवातीच्या काळात फारशा अडचणी आल्या नाहीत. योग्य रूटस्टॉक, संतुलित स्पेसिंग, सर्राईंगल पद्धतीचे ट्रेनिंग व छाटणी, तसेच ठिबक सिंचनाचा प्रभावी वापर हे त्यांच्या यशाचे प्रमुख गमक ठरले आहे.शेतीत ऑरगॅनिक व इनऑगनिक खतांचा संतुलित वापर, दरवर्षी माती परीक्षण आणि आवश्यकतेनुसार पीजीआरचा वापर केला जातो. कृषी तज्ज्ञ, प्रशिक्षण शिबिरे व केव्हीकेमार्फत सतत मार्गदर्शन घेतल्यामुळे उत्पादनात सातत्य राखणे शक्य झाले आहे.

सध्या एकरी सरासरी ९ ते ११ टन प्रीमियम दर्जाचे द्राक्ष उत्पादन मिळते, तर २-३ टन उत्पादन स्थानिक बाजारासाठी जाते. चांगल्या हंगामात उत्पादन ११-१२ टनांपर्यंत पोहोचते. हेक्टरी ८ लाख रुपये खर्च असून अनुकूल परिस्थितीत हेक्टरी १२-१३ लाख रुपये उत्पन्न मिळते. बहुतांश द्राक्षे निर्यातीसाठी जात असून ब्रिटनसारख्या देशांमध्ये निर्यात केली जाते.

द्राक्षशेतीमुळे या शेतकऱ्याच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती लक्षणीयरीत्या सुधारली आहे. उत्पन्न दुप्पट झाले असून घर, जमीन आणि आधुनिक शेती यंत्रसामग्री अशी स्थावर मालमत्ता निर्माण झाली आहे. नवीन द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना ते सांगतात, द्राक्षशेतीत यश मिळवायचे असेल तर शंभर टक्के लक्ष देणे, काटेकोर पाणी नियोजन करणे आणि योग्य व्यवस्थापन ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. या बाबी पाळल्या तर द्राक्षशेती निश्चितच फायदेशीर ठरू शकते.

ही यशोगाथा अनेक शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून आधुनिक तंत्रज्ञान, नियोजन आणि मेहनतीच्या जोरावर शेतीतही समृद्धी साधता येते, हेच या उदाहरणातून स्पष्ट होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज

रविवार दि. २५ जानेवारी २०२६ 

# वारकरी, भाविकांसाठी पश्चिमद्वार ते चौफळा एकेरी मार्ग

## पश्चिमद्वार ते चौफाळा एकेरी मार्ग रहदारीस खुला ठेवणेबाबतचे आदेश जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर दि.(२४) :- माघ यात्रा सोहळा गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६ रोजी संपन्न होत असून, यात्रा सोहळा कालावधी दि. २३ जानेवारी ते ०१ फेब्रुवारी असा आहे. या सोहळ्यासाठी सुमारे मोठ्या प्रमाणात भाविक शहरात येतात. विठ्ठल रूक्मिणी मंदिराकडे येणारा व जाणारा मार्ग एकच असलेने भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात असते. अशावेळी चेंगराचेंगरी होवून जीवित हानी होण्याची दाट शक्यता असलेने दि. २८ जानेवारी रोजी सकाळी ०६.०० ते दि.२९ जानेवारी २०२६ रोजीचे सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत पश्चिमद्वार ते चौफाळा हा मार्ग वारकरी, भाविक यांच्याकरीता बाहेर पडण्यासाठी एकेरी रहदारीस खुला ठेवणेबाबत आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जारी केले आहेत.

माघ यात्रा सोहळयाकरीता लाखो भाविक पंढरपूर शहर व परीसरात येतात व एकादशी सोहळयादिवशी चंद्रभागा स्नान करून भाविक श्री विष्ठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतात. तेव्हा महाद्वार घाट व आजूबाजूच्या रस्त्यामध्ये लाखो भाविकांची गर्दी असते. सदरची गर्दी नियंत्रणात आणणेसाठी पोलीस प्रशासनाला मानवी साखळीचा व रस्सीचा वापर करावा लागतो.

दिवसेंदिवस भाविकांची संख्या वाढत असून भाविकांना पुरविण्यात येणा-या सोईसुविधा कमी पडू नये यासाठी प्रशासन कार्यरत आहे.

**२८ जानेवारी रोजी सकाळी ६ ते २९ जानेवारी २०२६ रोजीचे सायंकाळी ६ वाजेपर्यंत एकेरी मार्ग रहदारीस खुला**

तथापि पंढरपूर शहरातील भाविकांची संख्या व सुरक्षितता लक्षात घेता यात्रा सोहळयात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाकडून गर्दी व्यवस्थापनाचे नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. पश्चिमद्वार ते चौफाळा हा एकेरी मार्ग झाल्यास स्टेशन रोडकडून येणारे वारकरी, भाविक हे श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक भादुले चौक ते नाथ चौक तांबडा मारूती चौक-महाद्वार चौकमार्गे नामदेव पायरी येथे दर्शनासाठी जावू शकतात. तसेच प्रदक्षिणामार्गे येणारे भाविक हे उत्पात गल्ली येथील रस्त्याने नामदेव पायरी येथे दर्शनासाठी जावू शकतात.

प्रशासनाकडून दर्शनरांग व्यवस्थापन करून गर्दी आटोक्यात आणण्याची कार्यवाही केली जाते. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिराकडे जाणारे रस्ते अरूंद असून त्याठिकाणी येणारे व जाणारा मार्ग एकच असलेने भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात असते. अशावेळी चेंगराचेंगरी होवून जीवितहानी होण्याची दाट शक्यता आहे. पश्चिमद्वार ते चौफाळा हा मार्ग वारकरी, भाविकांना बाहेर पडण्याचा एकेरी रहदारी मार्ग केल्यास गर्दीवर नियंत्रण करणे सुरक्षित होईल. त्यामुळे पश्चिमद्वार ते चौफाळा हा मार्ग वारकरी भाविकांसाठी बाहेर पडण्याचा एकेरी रहदारीसाठी होणे सुरक्षिततेच्यादृष्टीने महत्वाचे आहे.

या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष कुमार आशीर्वाद यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ३४ (क) अन्वये, सदर आदेश पारीत केला आहे.या आदेशाचे उल्लंघन झाल्यास उल्लंघन करणाऱ्या विरूद्ध आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ नुसार तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ नुसार कारवाईस पात्र राहील. असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# कै.बाळासाहेब वाघ स्मृती प्रित्यर्थ आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : के के वाघ शिक्षण संस्था के के वाघ फाउंडेशन व स्माईल व स्पिनॅच संयुक्त विद्यमाने कै. बाळासाहेब वाघ यांचे स्मृती प्रित्यर्थ मोफत नेत्र हृदय व महिला आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, सध्या डोळ्यावर मोबाईल, कॉम्प्युटर, टीव्हीमुळे येणारा ताण वाढला आहे. डोळ्यांच्या असंख्य समस्या रुग्णाला भेडसावत आहेत. आजच्या ताणतणावाच्या जीवनशैलीमुळे मानवी हृदयावर विपरीत परिणाम होत आहे, महिलांचे स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष यामुळे वेगवेगळ्या गंभीर आजारांना सामोरे जावे लागते. या सर्वांचा विचार करून सामाजिक बांधिलकीतून मोफत नेत्र, हृदय व महिला आरोग्य तपासणी महाशिबीर रविवार दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उगाव येते घेण्यात येणार आहे. तरी उगाव, खेडे, शिवडी, वनसगाव, ब्राम्हणगाव येथील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा. असे आवाहन संयोजक अजिंक्य बाळासाहेब वाघ यांनी केले आहे. मणिशंकर आय हॉस्पिटलच्या डॉ. प्राची पवार आणि श्री साई बाबा हार्ट इन्स्टिट्यूटचे निष्णात हृदय रोग सर्जन डॉ. अविनाश धर्माधिकारी हे तज्ज्ञ तपासणीसाठी उपस्थित राहणार आहेत. तरी गरजूंनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आयोजकांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे

# कळंब येथे फ्रेंड्स फॉरेव्हर फाऊंडेशनच्या वतीने वर्गमित्रांनी भरवले चार दिवसीय कृषी प्रदर्शन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : कधी कोरड्या तर कधी ओल्या दुष्काळाच्या छायेत सापडलेल्या कळंब तालुक्यात शेती दिवसेंदिवस तोट्यात जात आहे. त्यातच बियाणे, खते, औषधे, वीज व मजुरीच्या वाढत्या दरांमुळे शेतकऱ्यांचा शेतीचा ताळेबंद बिघडत चालला आहे. अशा परिस्थितीत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढवणे, खर्चात कपात करणे आणि शेतीकडे व्यवसाय म्हणून पाहण्याची सवय शेतकऱ्यांनी लावून घेणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन आमदार कैलास घाडगे पाटील यांनी केले.

कळंब येथे फ्रेंड्स फॉरेव्हर फाऊंडेशनच्या वतीने वर्गमित्रांनी एकत्र येत आयोजित केलेल्या किसान कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. हे चार दिवसीय कृषी प्रदर्शन सलग दुसऱ्या वर्षी आयोजित करण्यात आले असून, शेतकऱ्यांसाठी आधुनिक शेती तंत्रज्ञान, नव्या संधी आणि मार्गदर्शनाचे व्यासपीठ ठरत आहे.

प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी सकाळी शहरातील प्रमुख रस्त्यांवरून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत लेझीम पथक, सनई-संभळाचा नाद, पारंपरिक वेशभूषा यामुळे वातावरणात उत्साह संचारला होता. शाळकरी मुलींनी शेतकरी महिलांच्या वेशात सहभाग घेतला होता. सजवलेल्या बैलगाड्यांमधून शेतकरी सहभागी झाले होते. या शोभायात्रेमुळे संपूर्ण शहरात कृषी प्रदर्शनाबाबत उत्सुकता निर्माण झाली.

यानंतर तालुका क्रीडा संकुल परिसरात आयोजित करण्यात आलेल्या किसान कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन स्वागताध्यक्ष आमदार कैलास घाडगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष सुनंदाताई कापसे, पुणे येथील बायफ संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मनोजकुमार आवारे, भाजप तालुकाध्यक्ष मकरंद पाटील, ज्येष्ठ पत्रकार माधवसिंग राजपूत, शिवाजीराव गिड्डे, नगरसेविका रुकसाना बागवान, शिवसेना महिला आघाडी शहराध्यक्ष धनश्री कवडे, श्याम खबाले, विश्वजीत जाधव, युवासेना तालुकाप्रमुख पंडित देशमुख, फ्रेंड्स फॉरेव्हर फाऊंडेशनचे अध्यक्ष शीतल कवडे, सचिव अमोल उबाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार घाडगे पाटील म्हणाले की, आपल्या भागातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, शेतीतून होणारा तोटा कमी व्हावा यासाठी अशा प्रकारची कृषी प्रदर्शने अत्यंत उपयुक्त ठरतात. कोणते पीक कधी घ्यावे, कोणत्या पिकाला बाजारपेठेत मागणी आहे, खर्च कसा कमी करता येईल, आधुनिक यंत्रसामग्री व तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा याबाबत शेतकऱ्यांनी या प्रदर्शनातून मार्गदर्शन घ्यावे, असे त्यांनी सांगितले. नगराध्यक्ष सुनंदाताई कापसे यांनी आपल्या भाषणात कळंब बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवले जात असल्याचे सांगून, शेतकऱ्यांच्या हितासाठी नगरपालिकाही सदैव सहकार्य करेल, अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य जगदीश गवळी यांनी प्रभावीपणे केले. प्रास्ताविक भारत पारवे यांनी मांडले, तर आभार प्रदर्शन अमोल उबाळे यांनी मानले. यावेळी उदयचंद्र खंडागळे, धनश्री कवडे व शिवाजीराव गिड्डे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून प्रदर्शनाच्या आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. चार दिवस चालणाऱ्या या किसान कृषी प्रदर्शनात आधुनिक शेती तंत्रज्ञान, कृषी यंत्रसामग्री, बी-बियाणे, सेंद्रिय शेती, ड्रोन तंत्रज्ञान, कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि विविध स्टॉल्सचा समावेश असून, तालुक्यातील व परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# लोकमंगल बँकेच्या वतीने आई पर्यटन योजनेअंतर्गत व्यावसायिक कर्ज व महिला उद्योजिका मेळावा उत्साहात संपन्न

**श्री क्षेत्र आळंदी येथे लोकमंगल बँकेच्या वतीने ५०० महिला उद्योजिका घडविणार**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ह.भ.प श्री पुरुषोत्तम महाराज पाटील विश्वस्त, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी बँकेचे अध्यक्ष तथा आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या लोकमंगल बँकेच्या वतीने श्री क्षेत्र आळंदी येथे आई पर्यटन योजनेअंतर्गत व्यावसायिक कर्ज व उद्योजक मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. प्रारंभी आई कर्ज योजनेअंतर्गत महिलांना टूर्स अँड ट्रॅव्हल्स व्यवसायकरिता वाहन कर्जाचे चावी प्रदान सोहळा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.तसेच या योजनेअंतर्गत कर्जाचे चेक वितरण उपस्थित मान्यवरांच्या



हस्ते संपन्न झाला. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून श्री भरत लांघी,उपसंचालक पर्यटन संचालनालय पुणे तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे विश्वस्त ह.भ.प श्री पुरुषोत्तम महाराज पाटील, पर्यटन विभागाचे प्रकल्प अधिकारी श्री मयूर नांद्रे,लोकमंगल बँकेचे उपाध्यक्ष श्री प्रदीप नागणे, लोकमंगल पतसंस्थेचे संचालक श्री शिवाजी माळी आदी उपस्थित होते.

पर्यटन संचालनाचे उपसंचालक श्री भरत लांघी यांनी आई पर्यटन योजनेअंतर्गत विविध शासकीय माहिती उपस्थित महिलांना व ग्राहकांना दिली तसेच लोकमंगल बँकेच्या माध्यमातून जास्तीत जास्त महिला उद्योजिका घडवावे याकरिता पर्यटन संचानालय संपूर्ण सहकार्य करेल असे मनोगत व्यक्त केली. बँकेचे उपाध्यक्ष श्री प्रदीप नागणे यांनी लोकमंगल परिवार व लोकमंगल बँकेची सविस्तर माहिती उपस्थित सर्वांना दिली. कार्यक्रमास श्रीक्षेत्र आळंदी परिसरातील ग्राहक व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता लोकमंगल बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.श्री क्षेत्र आळंदी येथे लोकमंगल बँकेच्या वतीने ५०० महिला उद्योजिका घडविणार

# शासकीय ध्वजारोहण समारंभाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त शासकीय ध्वजारोहण समारंभ सोमवार दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ०९.१५ वाजता रेल्वे मैदान, पंढरपूर येथे होणार आहे.

उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहणाचा समारंभ संपन्न होणार असून, या समारंभास मान्यवर नागरिक, स्वातंत्र्य सैनिक तसेच शासकीय-निमशासकीय अधिकारी कर्मचारी यांनी राष्ट्रीय पोषाखात उपस्थित रहावे असे, आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

# लामजना जिल्हा परीषद गटातुन शालिनी रामदास चव्हान निवडणुक रिंगणात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : कॉंग्रेस उमेदवार शालिनी रामदास चव्हान यांच्या प्रचारार्थ लामजना येथे २६ जानेवारी रोजी मा.मंत्री आ अमितभैया देशमुख यांची जाहिर सभेच आयोजन, देशमुख कुटुंबाच्या मर्जीतला उमेदवार शालिनी रामदास चव्हान लामजना गटाचे विकासात्मक व्हीजन घेउन निवडणुक रींगणात, लातुर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे बिगुल वाजताच अनेकांची प्रतिष्ठा पणाला लागल्याने लातुर जिल्हा परीषद व औसा पंचायत समिती होत असलेल्या निवडणुकीत विकासाच व्हीजन घेउन लामजना जिल्हा परीषद निवडणुक लढण्यासाठी ओ.बी.सी चा चेहरा शालिनी रामदास चव्हान यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला असुन ,काँग्रेसचे एकनिष्ठ नेते मनुन परीचीत असलेले रामदास चव्हान यांच्या सौभाग्यवती ओ.बी.सी प्रवर्गातुन शालिनी चव्हान या लामजना जिल्हा परीषद निवडणुक लढवणार असुन लामजना जिल्हा परीषद गट हा काँग्रेसचा बालेकिल्ला असुन हा बालेकिल्ला सर करण्यासाठी सहकारमहर्षी दिलीपरावजी देशमुख, आ. अमितभैया देशमुख, मा.आ धिरजभैया देशमुख, जिल्हाध्यक्ष अभय साळुंके,प्रदेश सचिव श्रीशैल्य दादा उटगे, काँग्रेस नेते शेषेराव पाटील ,काँग्रेसचे तालुकाध्यक्ष किरण बाबळसुरे ,युवानेते मुकेश बिदादा ,युवक विधानसभा अध्यक्ष संजय लोंढे यांच्या मर्जीतला उमेदवार मनुन शालिनी रामदास चव्हान या कॉग्रेस पक्षाच्या वतिने निवडणुक लढणार आहेत. कॉग्रेस नेते रामदास चव्हान यांनी आत्तापर्यंत काँग्रेस पक्षासाठी दीलेले योगदान व पक्षसंघटणवाढीसाठी सदैव प्रयत्नशिल असल्याने व देशमुख कुटुंबाचे निकटवर्तीय



असल्याने पक्षाने रामदास चव्हान लढण्यासाठी बळ दिल्याचे बोलले जाते ,लामजना जिल्हा परीषद गटातुन निवडणुक लढवणार्या शालिनी चव्हान यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगीतले की मी लामजना गटातील महिला सक्षमिकरण सह लामजना सर्कलमधिल रस्ते ,पाणी ,विज सह लामजना गटाचा सर्वांगीण विकासाच व्हिजन घेउन लामजना जिल्हा परीषद निवडणुक लढवत असल्याचे सांगीतले ,यावेळी कॉग्रेस चे अधिक्रत उमेदवार शालिनी रामदास चव्हान यांनी २६ जानेवारी रोजी लामजना येथे आ.अमीतभैया देशमुख यांच्या प्रचार सभेला जास्तीत जास्त लोकांनी उपस्थीत राहण्याचे आवाहन केले आहे.

**'वैनतेयच्या' चिमुकल्यांनी घेतला ओंब्या, हरभरा,मक्याचा आस्वाद**

# गुलाबी थंडी, शेकोटीची ऊब अन..हुरडा पार्टीची धम्माल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी.

निफाड, ता. २४ : कडाक्याच्या थंडीत शेकोटी भोवती बसून गरमा गरम हुरड्याची मेजवाणी लुटण्याचा आनंद काही औरच.! 'शाळा मराठी माझी शाळा मराठी व..' या गीताला साजेसा उपक्रम निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर शाळेत साकार झाला. दप्तरमुक्त शनिवारनिमित्त विद्यार्थ्यांनी शेकोटीची ऊब घेत ओंब्या, हरभरा, मक्याचे कणीस भाजून खाण्याचा आनंद लुटला.

निफाडचे शेतशिवार सद्ध्या हरभरा, गहू, मका या पिकांनी बहरला आहे. वाढत्या शहरीकरणामुळे बंगल्यात शेकोटी पेटवून ओंब्या, हरभरा भाजणे दुर्मिळ झाले आहे. शिक्षक गोरख सानप, किरण खैरनार





यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वतः लाकडे गोळा करून मक्याचे कणीस, हरभरा, ओंब्या भाजून खाण्याचा आनंद लुटला. या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांना शेतीच्या रब्बी हंगामातील पिकांची माहिती, अन्न भाजण्याच्या पद्धती, अग्निपासून सावधानता, ग्रामीण भागातील इंधन म्हणून वापरले जाणारे सरपण, गोव-यांची उपलब्धता, गटकार्य, शेकोटीजवळच्या गप्पा या सर्वांचा अनुभव घेत गरमा- गरम हुरड्याचा आस्वाद घेता आला.

शाळेच्या आवारात भरलेल्या या हुरडा पार्टीने शिक्षणाचा अर्थ केवळ पुस्तकापुरता मर्यादित न ठेवता थेट अनुभवातून शिकवणारा ठरला. शाळेतील मंगला सोनवणे यांच्या हस्ते शेकोटी प्रज्वलित करण्यात आली. शिशुविहारच्या शिक्षिका व माध्यमिक विद्यालयातील शिक्षक यांनी ही चिमुकल्यांच्या या हुरडा पार्टी चा आनंद घेतला.

विद्यार्थ्यांच्या कृतीशीलतेला चालना देत स्वानुभवासाठी राबविलेल्या या उपक्रमाचे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, सचिव रतन वडघुले, विश्वस्त राजेद्र राठी, किरण कापसे,राजेश सोनी, ड. दिलीप वाघावकर, विश्वास कराड, मधुकर राऊत, नरेंद्र नांदे, प्रभाकर कुयटे, निफाड चे गटशिक्षणाधिकारी विलास साळी विस्तार अधिकारी लता भरसट, कैलास बोरसे, वसंत गायकवाड, केंद्रप्रमुख अनिता अहिरे, शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे व पालकांनी कौतुक केले.

दप्तरमुक्त शनिवारी चिमुकल्यांना हुरडा पार्टीचा प्रत्यक्ष कृतीतून आनंददायी पद्धतीने दिलेला अनुभव खूपच छान आहे. मराठी शाळा टिकवण्यासाठी शिक्षकांनी राबविलेला उपक्रम कौतुकास्पद आहे, असे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ, निफाडचे अध्यक्ष वि. दा. व्यवहारे यांनी सांगितले.

शाळेत आज पहिल्यांदा ओंब्या, हरभरा आणि मका स्वतः भाजून खाण्याचा आस्वाद आम्ही मुलांनी घेतला. खूप नवीन काही शिकायला मिळाले आणि कामाचे नियोजन यासोबत खूप मज्जा आणि धम्माल केली.आमचे शिक्षक नेहमीच आम्हाला विविध उपक्रमांद्वारे शिकण्यासाठी प्रेरीत करतात, अशी प्रतिक्रिया विद्यार्थिनी भाग्यश्री रायते हिने दिली.

# निरोगी जीवन जगण्यासाठी आयुर्विज्ञानातील तत्वांचे पालन करावे

## मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांचे प्रतिपादन; पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात भव्य आयुर्विज्ञान प्रदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : आयुर्विज्ञान रोगोपचाराचे शास्त्र नसून निरोगी, संतुलित आणि दीर्घ आयुष्य कसे जगावे हे सांगणारे शास्त्र आहे. चरक, सुश्रुत, वाग्भट यांसारख्या म हान ऋषींनी सुद्धा आपल्या ग्रंथांमध्ये आयुर्विज्ञानास प्रमाण मानले आहे, म्हणून नागरिकांनी निरोगी जीवन जगण्यासाठी आयुर्वेदातील तत्वांचे पालन केले पाहिजे, असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.




महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलातील सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्लिश विभागाच्यावतीने आयुर्विज्ञान प्रदर्शनाचा शुभारंभ करताना ते बोलत होते. यावेळी संस्थेच्या संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, जुनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी इंग्लिश विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, शरीरात वात, पित्त आणि कफ हे आजार उद्भवतात, त्या अनुषंगाने प्रत्येक व्यक्तीचा आहार, विहार व उपचार बदलतो. त्यामुळे जसा आहार तसा विचार आणि तसा आ-चार असे आयुर्विज्ञान सांगते औषधोपचारांसोबत पंचकर्म, योग, ध्यान, प्राणायाम आणि नैसर्गिक जीवनशैली यांना म हत्त्व दिले पाहिजे.

प्रास्ताविक दिगंबर जगताप यांनी केले, सूत्रसंचलन निशिगंधा सोमेश्वर यांनी केले आभार कल्पना स्वामी यांनी मानले. यशस्वीतेसाठी सुर्यकांत रूगे , मनिषा सुरवसे, रविकिरण दंतकाळे, दिगंबर जगताप, प्रा सल-ोनी शहा, शितल टिंगरे, प्रतिभा माने, यांनी प्रयत्न केले.

### प्रदर्शनातील कलाकृतीचे नागरिकाकडून कौतुक

**दोन दिवसाच्या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी पारंपारिक सेंद्रिय शेती आणि आधुनिक शेती यातील बदल, शिवकालीन खेडे, इस्त्रोचे माहिती पट, आयुर्वेदाचे महत्त्व, योगिक दिनचर्या,घनकचरा व्यवस्थापन, स्वदेशी सौंदर्यप्रसाधने, पशुपक्षांची घरटे, प्राणी व वनस्पतींचे प्रकार आदी कलाकृती उत्तम रित्या साकारल्या होत्या. प्रदर्शनातील कलाकृती पाहण्यासाठी प्रेक्षकांनी गर्दी केली होती, त्यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.**

### छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले प्रदर्शनातील विशेष आकर्षण

**छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक ऐतिहासिक वारसा यादीत निवड केली म्हणून विद्यार्थ्यांनी संकुलाच्या प्रांगणात १२ गड व किल्ल्यांची प्रतिकृती साकारली होती.**

---

# पालकांनी शाळेवरील प्रेम सदैव असेच राहु द्यावे : रामकृष्ण शेटे

### आदर्श विद्यालय सिंदखेड राजा येथे स्नेहसंमेलनाचे थाटात उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

स्थानिक आदर्श मराठी प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यामंदीर आणि आदर्श कॉन्व्हेन्ट ज्ञानपीठ,सिंदखेड राजा येथे शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.श्री. रामकृष्ण दादा शेटे यांच्या अध्यक्षतेखाली आदर्श विद्यालय व आदर्श कॉन्व्हेन्ट ज्ञानपीठ येथील तीन दिवसीय स्नेहसंमेलनाचे थाटात उद्घाटन संपन्न झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमाला व्यासपीठावर स्नेहसंमेलनाचे उद् घाटक म्हणून मा.श्री. सौरभ तायडे लोकनियुक्त नगराध्यक्ष, नगर परिषद, सिं.राजा हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून मा.श्री. तुष-ारजी डोडीया बी.ई.कॉम्प्यु. गोल्ड मेडलिस्ट हे होते.

शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक मा.श्री.सहदेवजी सुरडकर, मा.श्री.अरविंद-जी शिंगणे,मा.श्री. अशोकभाऊ कोटेचा, स्थानिक सल्लागार असलेले मा.श्री.छगन दादा मेहेत्रे, मा.श्री. अनंतराव खेकाळे, मा.श्री.प्रकाशराव वायकोस, मा.श्री.शिवप्रस-ादजी ठाकरे, मा.श्री. दिलीपजी काळे, मा.श्री. काशिनाथराव भालेराव, मा.श्री.तुळशीदासजी चौधरी, मा.श्री.रामभाऊ आढाव तसेच नगरपरिषदेचे नगरस-ेवक श्रीमती.सिंधुताई ठाकरे, सौ.पौर्णिमाताई भुसारे, सौ. सोनाली मेहेत्रे,श्री.कृष्णा मेहेत्रे, श्री.संतोष मेहेत्रे, ऍड. संदीप मेहेत्रे व डॉ.कृष्णा काळे शाळेचे मुख्याध्यापक श्री सुभाष मोरे सर, आदर्श कॉन्व्हेन्ट च्या मुख्यद्यापिका सौ.भाग्यश्री जायभाये मॅडम, माध्यमिकचे प्र.मुख्याध्यापक श्री.संदीप चौधरी सर, तसेच विद्यार्थी प्रतिनिधी आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी देवी सरस्वती, मां जिजाऊसाहेब व क्रांतीज्योती सावित्रीबाई फ ुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॉन्व्हेन्टच्या मुख्यध्यापिका सौ.जायभाये मॅडम यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून शाळेच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेतला.

कार्यक्रमाचे उद्घाटक यांनी उद्घाटनपर भाषणांमध्ये मी आदर्श विद्यालयाचा माजी विद्यार्थी असून या विद्यालयाने राबविलेल्या विविध उपक्रमामध्ये मी सहभाग नोंदवला असून याचा मला सार्थ अभिमान आहे,असे सांगितले.




शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.श्री. रामकृष्ण दादा शेटे आपल्या अध्यक्षीय भाषणांत बोलतांना म्हणाले की, स्नेह संमेलन म्हणजे विद्यार्थी,पालक व शिक्षक एकत्र यावे व आप-ापसामधील स्नेह, जिव्हाळा द्विगुणीत करावा, असेच पालकांनी शाळेवरील प्रेम सदैव असेच राहु द्यावे,असे प्रतिपादन केले. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.

यावेळी स्नेहसंमेलना निमित्ताने विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याच्या हेतूने विविध क्रीडा स्पर्धा तसेच निबंध, रांगोळी, वक्तृत्व यासारख्या स्पर्धा आयोजित केल्या आहेत .

सदर कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालक वर्ग व कर्मचारी बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. एन. एस. खरात मॅडम व कु.व्ही.ए.मेहेत्रे मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. एस.बी.हरकळ मॅडम यांनी केले.

---

# नळदुर्ग येथील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात एनसीसी विद्यार्थ्यांच्या पथसंचलनाचे प्रभावी सादरीकरण संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला बाल-ाघाट शिक्षण संस्था नळदुर्ग ता.तुळजापूर संचलित नळदुर्ग येथील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील एनसीसी (छउउ) च्या विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या प्रांगणात सादर केले सुंदर आकर्षक आणि प्रभावी विशेष पथसंचलन.

येथील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाने कॉलेजचे

प्राचार्य डॉ.सुभाष राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली तर बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी कॅबीनेट मंत्री नामदार मधुकरराव चव्हाण यांच्या प्रमुख उप-स्थितीत दि.२४ जानेवारी २२६ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला महाविद्यालयाच्या प्रांगणात विशेष पथसंचलनाचे सादरीकरण केले.





एनसीसी विभागप्रमुख लेफ्टनंट अतिश एस. तिडके यानी अत्यंत परिश्रम करून येथील एनसीसी विद्यार्थ्याकडून तयारी करून घेतली होती दिनांक २४ जानेवारी २२६ रोजी सकाळी १०.३० वा.सुमारास या पतसंस्थेला सुरुवात करण्यात आली आपल्या ड्रेस कोड मध्ये अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने प्रभावशाली पथसंचलन सादर केले.कॉलेजच्या इतिहासात पहिल्यांदाच अशा प्रकारचे मोठे पथसंचालनाचे सादरीकरण यावर्षी करण्यात आले.

या पथसंचलनाने उपस्थित सर्वांचे लक्ष वेधून घेतले.या वेळी कॉलेजचे वातावरण सैनिकीयमय झाले होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते एनसीसी मध्ये विविध उपक्रमात प्राविण्यपर पारितोषिक पटकाविलेल्या विद्यार्थांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नामदार मधुकरराव चव्हाण यानी या पथसंचलनात सहभागी झालेल्या सर्व एनसीसी विद्यार्थ्यांचे कॉलेजचे प्राचार्य डॉ.सुभाष राठोड,एनसीसी विभागाचे प्रमुख लेफ्टनंट अतिश एस.तिडके आदींचे विशेष अभिनंदन केले.

या प्रसंगी कॉलेजचे संचालक माजी नगराध्यक्ष शहबाज काझी,म ाजी नगरसेवक संजय बताले, मुस्ताक भाई कुरेशी, माजी प्राचार्य डॉ.मोहन बाबरे, परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक सचिव तथा कॉलेजचे माजी विद्यार्थी मारुती बनसोडे सह आजी माजी विद्यार्थी पालक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---


### पोलिसांकडून या गंभीर प्रकाराची चौकशी सुरू, परिसरात खळबळ

# जादूटोण्याच्या मदतीने अज्ञात व्यक्ती कडून अनिल पा. कुंदे यांना जीवे मारण्याची सुपारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : द्राक्ष पंढरी समजल्या जाणाऱ्या निफाड तालुक्यात विविध क्षेत्रात नावलौकिक प्राप्त केलेले निफाड नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे यांना जादूटोण्याद्वारे करणी करून जीवे मारण्याची सुपारी घेतल्या ची चिट्ठी लिहून संदेश देण्यात आला आहे या गंभीर प्रकाराबाबत निफाड पोलीस ठाण्यात जयदीप कुंदे यांनी रीतसर तक्रार दिली असून.. गुन्हा दाखल करण्यात आला आहे , या गंभीर प्रकाराने परिसरात खळबळ उडाली आहे.

निफाड नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे यांच्या शेतात बांधावर नुकतेच रात्रीच्या वेळी अज्ञात व्यक्तीने लिंबांना टाचण्या टोचलेल्या आढळून आले तसेच बीबे, हिरव्या बांगड्या,नारळ या वरती शेंदूर टाकलेला असून टाचण्या टोचलेल्या तिन काळ्याबाहुल्यानां तीन चिठ्ठ्या करून त्यांना बांधण्यात आल्या चे दिसुन आले , सदर प्रकार हा शेतामध्ये कामानिमित्त गेलेल्या जयदीप कुंदे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी ही माहिती दिली, एका चिठ्ठी मध्ये तिन्ही भावांच्या विषयी वेगवेगळी लिखाण केले असून चिठ्ठी मध्ये अनिल पा. कुंदे यांना राजकीय दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून असला प्रकार केल्याची शंका व्यक्त केली जात असून या चिठ्ठीम ध्ये. अनिल कुंदे साहेब तुम्ही प्रत्येक वेळेस निवडून येतात तुमच्या ........ ठेव आहे का, लोकांना लुटते, कुंदे साहेब आता तुम्हाला मारण्याची सुपारी मला दिली आहे अशी चिठ्ठी मध्ये धमकी दिली असून, उत्तम कुंदे तुम्हाला झुरुन मारेल असा दम दिला आहे तसेच सुनील कुंदे यांचे विषयीही या चिठ्ठी मध्ये, काही इशारा देण्यात





आला आहे.

अज्ञात व्यक्तीने जादूटोण्याच्या माध्यमातून जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. ....संबंधित व्यक्तींना अज्ञात व्यक्तींकडून चिठ्ठीद्वारे थेट जीवे मारण्याची सुपारी घेतल्याचा संदेश देण्यात आल्याने भीतीचे वातावरण पसरले आहे.

प्राप्त माहितीनुसार, धमकीच्या चिठ्ठीत काळी जादू, तांत्रिक उपाय व अमंगल शक्तींचा उल्लेख करण्यात आला असून, तुम्हाला म ारण्याची सुपारी मला दिली आहे अशा शब्दांत थेट इशारा देण्यात आला आहे. ही चिठ्ठी अत्यंत गंभीर स्वरूपाची असून, संबंधितांच्या जीवाला धोका असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

या प्रकरणाची तात्काळ दखल घेत निफाड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र बाविस्कर पोलीस नितीन सांगळे, विनोद जाधव, भास्कर पवार., यांनी या गंभीर प्रकाराची ची चौकशी सुरू केली आहे. धमकीची चिठ्ठी ताब्यात घेण्यात आली असून, हस्ताक्षर तज्ज्ञ, फॉरेन्सिक तपासणी. साठी पाठवण्यात आले आहे संशयितांचा शोध सुरू आहे.

दरम्यान, काळ्या जादूटोण्याच्या नावाखाली भीती निर्माण करून गुन्हेगारी वृत्ती ने दबाव टाकण्याचा हा प्रकार समाजात चिंतेचा विषय ठरत असून, अशा अंधश्रद्धा व गुन्हेग-ारी कृत्यांविरोधात कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.

पोलीस तपास पूर्ण झाल्यानंतर दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा विश्वास पोलीस प्रशास-नाने व्यक्त केला आहे.

**समाजामध्ये चांगले काम करणाऱ्याला विरोधक हे असतात ,माझ्या राजकीय अस्तित्वाला पायबंद घालण्यासाठी हा किळसवाणा प्रकार असून याला मी भिक घालत नाही ,निफाड शहरातील राजकारण हे किती खालच्या स्थराला गेले आहे हे यावरून लक्षात येते ,तरी ज्याला कुणाला विरोध करायचा असेल त्याने समोरासमोर येऊन विरोध करावा गेली २५ वर्षापासून मी गोरगरीब जनतेच्या व शहराच्या विकासासाठी अहोरात्र काम करत असून माझं राजकीय अस्तित्व अशा घाणेरड्या प्रवृत्तीच्या लोकांना सहन होत नाही, राजकीय हेतू डोळ्यासमोर ठेवून मला जादूटोणा करून माझं अस्तित्व संपविण्याचा हा घाणेरडा प्रकार असून मी अशा प्रकाराला घाबरत नाही ,कोणी कितीही मला मारण्याची सुपारी दिली तरी. मी संपणार नाही मी जनतेची सेवा करतच राहणार , तरी पोलिसांनी याची लवकरात लवकर चौकशी करून आमच्या कुटुंबाला न्याय द्यावा,**

**– अनिल पाटील कुंदे (उपनगराध्यक्ष निफाड नगरपंचायत)**